**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

आरईजी / २६० / २०१९–२० / ६६ दिनांक : ३० / ०५ / २०१९

प्रति
१. प्राचार्य संचलित / संलग्नीत महाविदयालये, एस.एन.डी.टी. महिला विदयापीठ, मुंबई.
२. संचालक, विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी एस.एन.डी.टी. महिला विदयापीठ, चर्चगेट, जूहू, पुणे.

**विषय : "भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार – २०१८ – २०१९"**

महोदय / महोदया,

एस.एन.डी.टी. महिला विदयापीठाशी संलग्न / संचलित महाविदयालये तसेच विदयापीठ आस्थापनेवरील शिक्षकेतर कर्मचारी यांचेसाठी **"भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार – २०१९"** साठी जाहीर करावयाचा आहे. सदर पुरस्कारासाठी सोबत जोडत असलेल्या विहित नमुन्यातील प्रपत्रात माहिती मागविण्यात येत आहे.

सदरचा पुरस्कार हा शिक्षकेतर कर्मचा–यासाठी असून **दिनांक ५ जुलै २०१९** रोजी विदयापीठाच्या वर्धापनदिनी प्रदान केला जाईल. सोबत पुरस्कारांचे नियम व अटी स्वयं–मुल्याकन व प्रतिवेदन प्रपत्र जोडले आहे.

**"भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार"** यासाठी संबंधित कर्मचा–यांने माहिती भरल्यानंतर मा. विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, संचालक यांनी भरलेल्या माहितीची शहानिशा करुन स्वत:च्या अभिप्रायासह सोबत जोडलेल्या स्वयं–मुल्यांकन प्रतिवेदन अहवाल गोपनियरित्या **दिनांक १५ जून २०१९** पर्यंत विदयापीठाचे कुलसचिव यांचेकडे पाठवावे. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर अहवाल पाठविताना लिफाफ्यावर **"भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार, स्वयं–मुल्यांकन प्रतिवेदन अहवाल"** असा स्पष्ट उल्लेख करावा.. सदर पत्र व त्या सोबतचे नियम व अटी, स्वयंमूल्याकंन व प्रतिवेदन प्रपत्र सोबत जोडत आहे.

३०।५

(डॉ. दिपक देशपांडे)
कुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

## भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार नियम व अटी:

१. हा पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१८–१९ साठी आहे.

२. ५ जुलै २०१९ विदयापीठाच्या वर्धापन दिनी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३. भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार एक विदयापीठीय व एक संलग्नीत महाविदयालय पातळीवर देण्यात येईल.

४. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शॉल, श्रीफळ असे राहील.

५. पुरस्कार विद्यापीठ / महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी (तांत्रिक व अतांत्रिक पदे) मधून देण्यात येईल. सैंविधानिक पदांचा हया पुरस्कारासाठी विचार करण्यात येणार नाही.

६. तांत्रिक/अतांत्रिक अधिका–याची/कर्मचा–याची किमान १५ वर्षे नियमित वेतनश्रेणीमध्ये नियुक्ती झालेली असून त्यामध्ये खंड नसावा व तो अधिकारी/कर्मचारी सेवेत कायम असावा.

७. संबंधिताच्या यापूर्वीच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांपैकी किमान तीन वर्षांचे गोपनीय अहवाल (अ) दर्जाचे असावेत.

८. पुरस्कार विभागून देता येणार नाही.

९. संबंधित कर्मचा–यांची कामगीरी वैशिष्टपूर्ण/नाविन्यपूर्ण असावी.

१०. संबंधित कर्मचा–यांनी मागील १० वर्षामध्ये शैक्षणिक पात्रता वाढविली असल्यास तसेच वैशिष्यपूर्ण प्रशासकीय किंवा तांत्रिक कौशल्य आत्मसात केले असल्यास, त्याची विशेष नोंद घेण्यात येईल.

११. शिफारस करतेवेळी विद्यापीठाच्या /महाविद्यालयाच्या शैक्षणिक/प्रशासकिय विभागातील प्रमुखांना / प्राचार्यांनी त्यांचे स्पष्ट अभिप्राय गोपनीयरित्या द्यावेत.

१२. ज्या कर्मचा–याची शिफारस केली जात आहे त्यांनी यापूर्वी प्राप्त केलेले पुरस्कार, बक्षीसे, विशेष कामासंदर्भात गौरविले असेल, त्या पुरस्कार/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक राहील.

१३. कर्मचा—यांस शिक्षा झालेली नसावी. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी चालू नसावी किंवा कारवाई झाली नसावी किंवा कोणतेही आरोप ठेवलेले नसावेत.

१४. कर्मचा—याच्या बाबतीत कोणताही नैतिक अध:पतनाचा गुन्हा शाबीत झाला नसावा/चालू नसावा अथवा त्यांचेवर कोणतीही कार्यवाही चालू नसावी.

१५. मा. विभागप्रमुखांनी / प्राचार्यांनी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल.

१६. अधिक तपशीलासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडण्यास हरकत नाही.

१७. आवश्यक सेवेचा अनुभव व वयाचा पुरावा दाखविणारी कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१८. स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शॉल, श्रीफळ स्विकारण्यास प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक राहील.

१९. छाननी समितीचा निर्णय अंतीम राहील.

२०. छाननी समितीस आवश्यक वाटल्यास अर्जकर्त्याची माहिती तपासण्याचे अधिकार समितीस राहतील.

२१. आवश्यक त्या महितीचा अर्जात अभाव आढळल्यास निवड समिती अशा अर्जांचा विचार करणार नाही.

२२. काही अपरिहार्य कारणाने पुरस्कार प्राप्त कर्मचा—यांस कार्यक्रमाच्या दिनी उपस्थित राहता आले नाही तर तशी सूचना देवून विद्यापीठ कार्यालयातून समक्ष पुरस्कार घेऊन जावा.

२३. दिलेल्या पुरस्काराचा, प्रमाणपत्राचा व स्मृतीचिन्ह याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता पुरस्कार प्राप्तांनी घेणे आवश्यक आहे.

30/5

**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in



२४. प्राप्त होणा—या अर्जाची छाननी करण्यासाठी व सेवकाची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

१. मा. कुलगूरू यांनी नामनिर्देशित केलेले मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य (एक) — (अध्यक्ष)

२. मा. कुलगूरू यांनी नामनिर्देशित केलेली प्राचार्य (एक)

३. मा. कुलगूरू यांनी नामनिर्देशित केलेले प्रशासकिय क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती (एक)

४. मा. कुलगूरू यांनी नामनिर्देशित केलेले शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती (एक)

५. मा. कुलसचिव

२५. संबंधित अधिकारी / कर्मचारी सेवेत असताना जास्तीत जास्त एकदा पुरस्कारास पात्र असेल.

२६. याव्यतिरिक्त परिस्थितीच्या तपशीलानुसार आणि वरील नियमांचे अर्थ लावण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना राहतील.

२७. योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, सदर पुरस्कार राखून ठेवण्याचे अधिकार विदयापीठाकडे राहतील.

२८. अर्जदाराने माहिती मराठी /हिंदी / इंग्रजी हया पैकी कोणत्याही एका भाषेत भरुन दयावी.

२८. मुल्याकंन

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | गोपनीय अहवाल | — | ४० गुण |
| (ब) | सेवकांचा / कर्मचा—यांचा स्वत:चा अभिप्राय ३०० शब्दात | — | २० गुण |
| (क) | मुल्याकंन अहवाल (Peer Feed Back of two persons) | — | २० गुण |
| (ड) | सेवाकालावधीत कर्मचा—यांची शैक्षणिक / तांत्रिक प्रगती | — | २० गुण |

(signature) ३०/५

(डॉ. दिपक देशपांडे)
कुलसचिव